**बावची आणि गोटखिंडी गावातील**

**बारावी पास विद्यार्थ्यांची भेट व समुपदेशन अहवाल**

**दि. 4/6/2024**

गोटखिंडी येथील ज्युनिअर कॉलेजमधील एकूण बारावी सायन्स चे 78 विद्यार्थी असून त्यापैकी 6 मुलांनी फॉर्म भरले नाहीत 5 मुले नापास आहेत आणि 7 विद्यार्थी परीक्षेला गैरहजर आहेत. तसेच 12, वी आर्ट्स मध्ये 28 विद्यार्थी होते.




बावची या गावांमध्ये बारावी पास झालेल्या विद्यार्थ्यांची भेट आणि समुपदेशन करण्यासाठी व त्यांचे अभिनंदन दिनांक 4 जून 2024 रोजी आयोजित भेट केली होती. या भेटीमध्ये बारावी पास विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. सदर विद्यार्थ्यांना आपल्या कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजमधील विविध उपक्रम, कर्मवीर स्पर्धा परीक्षा प्रबोधिनी तसेच विविध करिअरच्या संधी आणि कॉलेजमधील माजी विद्यार्थ्यांविषयी चर्चा करण्यात आली.

यामध्ये पाऊस खूप झाल्यामुळे अनेक विद्यार्थी येऊ शकले नाहीत. मात्र 12 विद्यार्थी सहभागी झाले होते या विद्यार्थ्यांना आपल्या कॉलेजमध्ये बी.एससी बी.कॉम आणि बीए व संगणक शास्त्र विभाग, मायक्रोबायोलॉजी, बायोटेक या ठिकाणी प्रवेश घेण्याबाबत समुपदेशन करण्यात आले दोन तास समुपदेशन झाले. अनेक विद्यार्थ्यांना आपल्या कॉलेज विषयी माहिती होती त्यांनी सांगितले की आम्ही नीट चा पेपर दिलेला आहे त्यांचा निकाल आल्यानंतर आम्ही कॉलेजमध्ये प्रवेश घेण्यात येणार आहोत मात्र तत्पूर्वी आम्ही बारावी सायन्सचे विद्यार्थी आणि मेडिकल फार्मसी आणि इंजीनियरिंग या विविध क्षेत्रात प्रवेश घेण्याचा प्रथम प्रयत्न करणार आहोत आणि त्यानंतर जर तिकडे प्रवेश मिळाला नाही तर आम्ही नक्कीच आपल्या कॉलेजमध्ये बी.एससी किंवा कम्प्युटर मायक्रोबायोलॉजी, बायोटेक किंवा बी. ए प्रथम वर्षासाठी प्रवेश घेऊ.




12 कला पास झालेल्या विद्यार्थ्यांशी चर्चा केल्यानंतर तसेच काही विद्यार्थ्यांना फोनवर संपर्क केल्यानंतर 28 विद्यार्थ्यांपैकी 9 विद्यार्थी परीक्षेला बसलीच नाहीत 19 विद्यार्थ्यांमधील 8 विद्यार्थी हे आयटीआय ला प्रवेश घेणार आहेत 6 विद्यार्थी डीएडला प्रवेश घेणार आहेत आणि 5 विद्यार्थी आपल्या कॉलेजमध्ये BAI ला प्रवेश घेणार आहे तसेच वरील विद्यार्थ्यांना जर आयटीआय ला किंवा D. Ed ला नंबर लागला नाहीच तर ते विद्यार्थी शेवटी आपल्या कॉलेजला ऍडमिशन घेणार आहेत.




गोटखिंडी कॉलेज कडून आर्ट्स आणि सायन्सच्या विद्यार्थ्यांची यादी मागितली.

आर्ट्स आणि सायन्स ज्यु. कॉलेज गोटखिंडी भेट

दि.11/6/2024




मात्र गोटखिंडी कॉलेजमधील मुख्याध्यापक व शिक्षकांना विनंती केल्यानंतर विद्यार्थ्यांचे दाखले 11/6/2024 रोजी देणार आहेत या एका दिवशी ते सर्वांना बोलवणार आहेत असे आम्हाला सांगितले त्यामुळे मी आणि किशोर भाऊ थोरात आम्ही दोघेही गोटखिंडी कॉलेजमध्ये जावून बारावी पास झालेल्या विद्यार्थ्यांची भेट आणि समुपदेशन करण्यासाठी व त्यांचे अभिनंदन करण्यासाठी दिनांक 11 जून 2024 रोजी भेट आयोजित केली होती. या भेटीमध्ये बारावी पास विद्यार्थ्यां सहभाग घेतला.




यावेळी प्राचार्य एम. बी. पाटील , मा. सुशांत शिगटे यांच्या हस्ते अभिनंदना चे पत्रदेवून सत्कार केलासोबत प्रा. एस. के. खडसे .




काही पालक हजार होते त्यानाही मुलगा 12 वी पास झाल्याबद्दल त्यानही पत्र देवून सत्कार केला.
सदर सर्व विद्यार्थ्यांना आपल्या कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजमधील विविध उपक्रम, विद्यार्थी विद्यार्थिनी साथी विविध सोई सुविधा, कर्मवीर स्पर्धा परीक्षा प्रबोधिनी तसेच विविध करिअरच्या संधी आणि कॉलेजमधील माजी विद्यार्थ्यांविषयी चर्चा करण्यात आली.



सर्व विद्यार्थ्यांना एकत्रित आम्ही आपल्या कॉलेजच्या प्रवेशाविषयी कॉलेजच्या प्रगती विषयी कॉलेजमधील विविध उपक्रम स्पर्धा परीक्षा केंद्र तसेच मुलींना सोयी सवलती इत्यादी विषयी सविस्तर माहिती सांगून व समुपदेशन करून आपल्या कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजला प्रवेश घ्या अशी विनंती केली आहे .

आपला विश्वासू

मा.प्रा.डॉ. संतोष खडसे
मा. किशोर थोरात